# मराठवाडा नेता

Fri 15 Aug 25


# दत्तुसिंह चौहान प्रशालेत सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळा



लातूर/प्रतिनिधी : डिजिटल सुरक्षिततेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ऊलशी ड्हळझीहर षी ऊलशी डीरज़ीहर मोहिमेअंतर्गत सोमवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी दत्तुसिंह चौहान प्रशाला, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा उत्साहात पार पडली.

महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील 'सायबर वॉरियर्स' - ओमकार राजेंद्र सूर्यवंशी आणि अर्जुन गंगाधर चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडिया व इंटरनेटचा सुरक्षित वापर, फिशिंग ईमेल व मेसेज ओळखण्याचे तंत्र, मोबाईल व ब्राउझर सुरक्षा, गोपनीयता सेटिंग्ज, मजबूत पासवर्ड, तसेच दोन-स्तरीय प्रमाणीकरण (२ऋ-) याबद्दल माहिती दिली. याशिवाय ऑनलाईन फसवणूक व आर्थिक ठगींचे प्रकार, त्यांची लक्षणे, प्रतिबंधक उपाय आणि सायबर गुन्ह्यांची नोंदणी प्रक्रिया, हेल्पलाइन क्रमांक: १९३० याविषयीही सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी प्रत्यक्ष उदाहरणे, प्रश्नोत्तर सत्र आणि अनुभवकथांचा उपयोग करण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न विचारून शंका दूर केल्या. गेल्या तीन वर्षांपासून लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या या उपक्रमाचे उद्दिष्ट शालेय स्तरावर डिजिटल सुरक्षा विषयक मूलभूत ज्ञान देऊन विद्यार्थ्यांना ऑनलाइन धोके ओळखण्यास सक्षम करणे आहे. आयोजकांनी पुढील काळात अधिक शाळांमध्ये आणि विविध स्तरांवर अशा कार्यशाळा आयोजित करण्याचा संकल्प व्यक्त केला. अभिप्राय सत्रात विद्यार्थी व शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. शिक्षकवर्गाने सांगितले की अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची भावना व सुरक्षिततेची जाणीव वाढते. प्रमुख उपस्थितांमध्ये मुख्याध्यापक श्री. अर्जुनसिंह ठाकूर, शिक्षकवृंद श्री. कमलाकर वाघमारे, श्री. धनंजय शेळके, श्री. गणेश राठोड, श्री. बालाजी चाटे, श्री. आशुतोष काथवटे, श्रीमती वृषाली गायकवाड, श्रीमती केशर शिरपुरे यांनी कार्यशाळेचे कौतुक केले.



Powered by Ashvamedh Software - 9975208920